# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

दिनांक 11/10/2017 रोजी (का.प.क्र.11) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक 11 ऑक्टोबर 2017 रोजी (का.प.क्र.10) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 12-10 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग,नगरसचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
07. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
08. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
09. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
10. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
11. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
12. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
13. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

मा. सभापती : मा.आयुक्त आज या बैठकीला येणार आहे का? मा.आयुक्त याना मी पत्र दिले होते, की मागच्या मिटिंगमधे झालेल्या निर्णयावर अंमलबजावणी बाबत चर्चा करण्यासाठी मा.आयुक्त उपस्थित राहणे अपेक्षित होते. त्यांना विनंती केली. त्यांचा फोन बंद असल्यामुळे त्यांच्या सचिवांना एक पत्र माझ्या सचिवाने पाठवले होते, या बाबतीत प्रशासनाने खुलासा करावा.

मा.अतिरिक्त आयुक्त :मा.आयुक्त यांनी मला आजच्या सभेत उपस्थित राहण्यासाठी आदेशित केले आहे. म्हणून मी या सभेत उपस्थित आहे. मा.आयुक्त सभेस येणार नाहीत.

मा. सभापती :जो निर्णय आम्ही सभेत घेतो त्याची अंमलबाजावणी प्रशासनाने करणे अपेक्षित आहे. मा.आयुक्त साहेबांना विनंती केलेली आहे, या सभेत उपस्थित राहून आम्हाला सहकार्य करावे. पण ते आलेले नाहीत. तरी मी या ठिकाणी स.सदस्यांना सांगु इच्छितो की आजच्या बैठकीत फक्त जे विषय आहेत त्यांना मंजुरी देऊन त्याबद्दलची चर्चा करणार आहोत. हे सर्वांनी लक्षात घ्यावे.

श्री. सिताराम सुरे :जायकवाडी धरणातुन किती एमएलडी पाणी येते? N-5 च्या टाकीत आणि N-7 च्या टाकीत किती एमएलडी पाणी येते? पुर्णपणे सव्वा दोन तास हडको, जाधववाडी, मयुर पार्क, सुरेवाडी असेल या पुर्ण भागाला पाणी येत नाही. याचे कारण काय?

मा.सभापती :सर्वांना समान पाणी पुरवठा होणे अपेक्षित आहे. संबंधीत अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(या वेळी सर्व सं.सदस्य एकाच वेळी बोलत होते.)

श्री राजगौरव वानखेडे :पाणी प्रश्ना संदर्भात मागिल आठ-दहा मिटींगमध्ये चर्चा केली होती. प्रशासनाने कोणतीही दखल घेतलेली नाही.

कार्यकारी अभियंता(पा.पु) :काही भागात दोन दिवसाआड व काही भागात तीन दिवसाआड पाणी येत आहे.

श्री सय्यद मतीन : ह्या यादी नुसार शहरामध्ये समान पाणी देऊ शकतो की नाही?

कार्यकारी अभियंता(पा.पु) : शहरामध्ये समान पाणी पुरवठा करण्यासाठी प्रत्येक भागात तीन दिवसाआड पाणी सोडावे लागेल.

श्रीमती स्वाती नागरे :जर तीन दिवसाआड पाणी सुरु केले तर दोन दिवसामध्ये साठविलेले पाणी दुषित होते. त्यामुळे आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो. दोन दिवसाआड पाणी पुरवठा केला पाहिजे.

मा. सभापती :समान पाणी का दिले जात नाही? खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता(पा.पु) :पाणीपुरवठा तीन दिवसाआड केल्यानंतर सर्वांना समान पाणी पुरवठा होईल.

मा.सभापती :स.सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे जर दोन दिवसाआड पाणी पुरवठा केल्याने सर्वांना पाणी मिळेल. तर त्या प्रकारे पाण्याचे नियोजन करण्यात यावे. सर्वांना समान पाणी पुरवठा करण्यात यावा.

मा. मतीन रशीद :महानगरपालिकेच्या 9 शिक्षकांना अवार्ड दिला गेला होता. त्यामध्ये एकही उर्दु शाळेच्या शिक्षकांचे नाव नव्हते. दुसऱ्या दिवशी आदर्श पूरस्कार नाटगृहात दिला जाणार होता. आयुक्तांना या संदर्भात बोललो तर एनवेळी शिक्षण अधिकारी यांनी एका उर्दु शिक्षकाचे नाव त्यात टाकले. अगोदर जी यादी केली होती त्यात उर्दु शिक्षक का घेतले नव्हते?

शिक्षण अधिकारी :15 दिवस अगोदर पत्र काढले होते. जर 15 वर्षाची सर्व्हीस असेल, चांगले काम असेल, चौकशी प्रकरण नसेल अशा अटी जीआर नुसार आहे. त्यानुसार हे पत्र दिले गेले होते. मला जे प्रपोजल आले होते ते मी कमिटीच्या समोर ठेवले. ज्यांच्या विषयी काही कंम्पलेंट होती की, उर्दू शिक्षकांविषयी एक प्रस्ताव असा होता की, त्यांची कंम्पलेंट होती म्हणुन ते यादीत नाही दिले. बाकीचे प्रस्ताव होते ते मी रफिक सरांना फोन करुन सांगितले होते की, एक प्रपोजल द्यावे. सगळे प्रपोजल कमिटिच्या समोर गेल्यानंतर उर्दू मध्ये असे प्रस्ताव नव्हते. उर्दूचा एकच प्रस्ताव होता, त्यामध्ये कमिटिची मिटिंग झाल्यानंतर मी पण प्रयत्न करत होतो की, उर्दू शिक्षकाला अवार्ड देण्यासाठी एक तरी प्रस्ताव मिळाला पाहिजे.

श्री सय्यद मतीन :मा.आयुक्तांनी सांगितल्यावर समावेश केला. पुर्वीचे यादीत नाव टाकण्याचे समजले नाही का?

मा.सभापती :याबाबतचा खुलासा उपआयुक्तांनी करावा.

उपआयुक्त (प्र) :या संदर्भात प्रस्ताव मागितले होते. त्या प्रस्तावामध्ये एकाच उर्दु शिक्षकाचा प्रस्ताव दिला होता. त्याची मुदत होती, की अमुक तारखेपर्यंत प्रस्ताव शिक्षण विभागामध्ये देण्यात यावा. जेव्हा ही बाब समिती समोर आली की, एकाच उर्दु शिक्षिकासाठी प्रस्ताव आलेला आहे. बाकीच्या उर्दू शिक्षिकांना 15 दिवसांचा कालावधी दिला होता. मुदत संपण्यापुर्वी कुठलाही प्रस्ताव आलेला नव्हता. एक उर्दू शिक्षिका होत्या त्यांच्या संदर्भात तक्रार असल्याकारणाने तो प्रस्ताव स्थगीत ठेवला. आणि जे 15 प्रस्ताव आले होते, याच्यापैकी ज्याचे खाते चौकशी प्रस्थापित नाही,ज्याचे काम चांगले आहे,ज्याच्यावर कुठल्याही प्रकारचे आरोप

नाही,अशा पध्दतीच्या शिक्षकांची निवड केली.निवड करतांना निवड समितीला असेही लक्षात आले की, एकही उर्दू शाळेच्या शिक्षकाचा किंवा उर्दू शिक्षकांचा यामध्ये समावेश होत नाही.त्याकारणाने प्रस्ताव नसतांना सुध्दा प्रशासनाच्या माध्यमातून एक उर्दू शिक्षकांना आम्ही पुरस्कारामध्ये त्यांचे नाव जाहीर केले आणि त्यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

श्री सय्यद मतीन :दोन- तीन शिक्षक उर्दूचे घ्यायला पाहिजे होते. शिक्षण अधिकारी यांना चौकशी करायला लावावी. आणि याबाबतचा अहवाल पुढच्या बैठकी पर्यंत सादर करण्याचे आदेशित करावे.

मा. सभापती :या प्रकरणाबाबतची शिक्षण अधिकारी यांनी माहिती घेऊन पुढच्या बैठकी पर्यंत अहवाल सादर करावा. इतर कुठल्याही प्रकारच्या विषयाबाबत आज चर्चा केली जाणार नाही. कारण आजच्या बैठकीमध्ये मा.आयुक्त व इतर अनेक अधिकारी गैरहजर आहेत. आजची बैठक संपवण्यापुर्वी जे विषय आहेत, ते मंजुर करु विकास कामामध्ये अडथळा निर्माण होणार नाही. आता विषय पत्रिका घेण्यात येते चर्चा पुढच्या बैठकीत करण्यांत येईल.

**विषय क्र. 122 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.110 अंतर्गत गादीया विहार परीसरातील अंतर्गत रस्त्यांचे व्हॉईट टॉपींग करणे व रोड साईड पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 दरसुचीनुसार रक्कम रूपये 29,99,375/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 03/07/2017 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील मा.स्थायी समितीने शिफारस केलेल्या कामा अंतर्गत पृष्ठ क्र. SCR-Ward-8 P.No.64 वरील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकांतर्गत अ.क्र.02 तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,99,375/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.122 मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.110 अंतर्गत गादीया विहार परीसरातील अंतर्गत रस्त्यांचे व्हॉईट टॉपींग करणे व रोड साईड पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.29,99,375/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 123 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.110 अंतर्गत विविध ठिकाणी (चाणक्यपुरी ते त्रिशरण चौक या 15.00 मी. रूंद वि.यो. रस्त्याच्या उर्वरीत भागाचे) कॉंक्रीटीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सन 2015-2016 दरसुचीनुसार र. रू.29,82,530/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दिनांक 03/07/2017 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च अर्थसंकल्प 2017-2018 मधील मा.स्थायी समितीने शिफारस केलेल्या कामा अंतर्गत पृष्ठ क्र. SCR-Ward-8 P.No.64 वरील नवीन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षकांतर्गत अ.क्र.01 तरतुद उपलब्ध आहे.

करीता सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रूपये 29,82,530/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.123 मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.110 अंतर्गत विविध ठिकाणी (चाणक्यपुरी ते त्रिशरण चौक या 15.00 मी. रूंद वि.यो. रस्त्याच्या उर्वरीत भागाचे) कॉँक्रीटीकरण करणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या र.रू.29,82,530/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 124 :**

विषय : वार्ड क्र.112 शिवाजीनगर मधील भारतनगर व साईनगर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व सिमेंट कॉक्रींट करणे बाबत. या कामाचे ठेकेदार मे.रूद्र कन्स्ट्रक्शन यांचेकडून अ.प. दराने म्हणजेच टेंडर र.रू.99,87,486/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.-2017-AMC-227948-1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.06 |
| 2. | कामाचे स्वरुप | मजबुतीकरण व कॉँक्रीट करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | -- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 99,87,486/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई निविदा सूचना दिनांक 18/05/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | -- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 07/08/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.रूद्र कन्स्ट्रक्शन | 9987486/- | अ.प. दराने |
| 2 | मे.बालाजी कन्स्ट्रक्शन | 10986235.31 | 10% जास्त दराने |
| 3 | श्री.अनिल पी वाठोरे कॉन्ट्रॅक्टर | 11185985.04 | 12% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | दलित वस्ती सुधार योजना |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | --- |
| | तरी विषयांकित कामाचे अ.प. मंजुरीसह सदर काम ठेकेदार मे.रूद्र कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.99,87,486/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय क्र.124 मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.112 शिवाजीनगर मधील भारतनगर व साईनगर येथे दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत विविध रस्त्यांचे मजबुतीकरण व सिमेंट कॉक्रींट करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.रूद्र कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर र.रू.99,87,486/- पर्यंत करून घेणे अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 125 :**

विषय : टि.व्ही. सेंटर, हर्सुल व पडेगांव येथे अग्निशमन केंद्र उभारणे या कामाचे ठेकेदार श्री.कुरेशी मो.अब्दुल खलील यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच 0.00010% कमी दराने म्हणजेच र.रू.24934958/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर Tender Id.-2017-AMCA-213998-2

महाशय,

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता (वार्ड क्र.1,2,3 व 8) |
| 2. | कामाचे स्वरुप | अग्निशमन केंद्र बांधणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | पुर्वगणकपत्रक मान्य झाले आहे मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.817 दिनांक 29/12/2016 |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 2,49,57,887/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | ई टेंडरींग मार्फत दिनांक 01/08/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 04/08/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 09/08/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 (तीन) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | कुरेशी मो.खलील | 24934958.02 | 0.00010% कमी दराने |
| 2 | शहा कन्स्ट्रक्शन | 26877418.13 | 7.79% जास्त दराने |
| 3 | हायटेक इन्फ्रा. औरंगाबाद | 27421000.76 | 9.97% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | नाही |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | अग्निशमन विभाग या उप लेखाशिर्षात पान क्र.-55 अ.क्र.2 नुसार उपलब्ध रू.535.00 लक्ष तरतुदीमधून |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | नाही |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार श्री.कुरेशी मो. खलील यांचेकडून 0.00010% कमी दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.24934958.02/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती :शासनाने व्हॅट ऐवजी जी.एस.टी. लागू केलेला आहे,सदर एजन्सीने नविन कर प्रणालीनुसार मान्यता मिळावी म्हणुन विनंती केलेली आहे.दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टि.व्ही. सेंटर, हर्सुल व पडेगांव येथे अग्निशमन केंद्र उभारणे या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त झालेल्या निविदापैकी सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.कुरेशी मो.अब्दुल खलील यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.00010% कमी दराने म्हणजेच र.रू.24934958.02/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस तसेच शासनाने व्हॅट ऐवजी जी.एस.टी. लागू केलेला असल्यामुळे व सदर एजन्सीने नविन कर प्रणालीनुसार मान्यता मिळावी म्हणुन विनंती केलेली असल्याने त्यासही दुरूस्तीसह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र.126 :**(विषय क्र.103 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि.13/09/2017 (का.प.क्र.08) रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे.)

विषय : वार्ड क्र.80 अंतर्गत एन-3 सिडको येथील अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे बाबत या कामाचे ठेकेदार मे.एस.डी.दौंड कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दराने म्हणजेच टेंडर र.रू.46,96,103/-पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : दरपत्रक सूचना (Closed offer) दि.28/04/2017

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.06 |
| 2. | कामाचे स्वरुप | कॉंक्रीट करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 4996103/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | जा.क्र./मनपा/उपअभियंता झोन क्र.06/935/ दिनांक 28/04/2017 (Closed offer) |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | दिनांक 18/07/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 01 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नांव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त** |
|---|---|---|---|
| 1 | मे.एस.डी. दौंड कन्स्ट्रक्शन | 4996103/- | अं. प. दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | मा.स्थायी समिती सभा दि.26/11/2016 विषय क्र.76 |
| | तरी विषयांकित काम ठेकेदार मे.एस.डी.दौंड कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दराने म्हणजेच टेंडर रक्कम रू.46,96,103/-पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. | |

मा.सभापती : विषय क्र.126 मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.80 अंतर्गत एन-3 सिडको येथील अंतर्गत विविध ठिकाणी रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे या कामासाठी (Closed offer) नुसार प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.एस.डी.दौंड कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प. दराने म्हणजेच टेंडर र.रू.46,96,103/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 127 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, झोन क्र.06 अंतर्गत वार्ड क्र.79 ते 85 आणि विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी पॅचवर्क करणे या कामाचे अंदाजपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग सन 2015-16 च्या दरसुचीनुसार र.रू.49,87,470/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून या कामाचा खर्च सन 2017-18 च्या अर्थसंकल्पातील "रस्ते दुरूस्ती पॅचवर्क" या लेखाशिर्षक मधुन करण्यात येईल.

करीता अंदाजपत्रक र.रू.49,87,470/- च्या अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विषय क्र.127 मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र.06 अंतर्गत वार्ड क्र.79 ते 85 आणि विविध रस्त्यांची दुरूस्ती व डांबरी पॅचवर्क करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या र.रू.49,87,470/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 128 :**

मा.अतिरिक्त आयुक्त यांच्या मान्यतेनुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे नागरी क्रिडा केंद्र क्र.5, एन-2, कम्युनिटी सेंटर सिडको येथील मागील गेटच्या बाजुची जागा गदा स्पोर्टस असोसिएशन, औरंगाबाद (कराटे प्रशिक्षक) यांनी कराटे प्रशिक्षण वर्गासाठी सायंकाळी 07 ते 09 या वेळेत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्य दरानुसार प्रति खेळाडु प्रतीमाह 1 तास रक्कम रूपये 100/- (अक्षरी शंभर रूपये फक्त) या प्रमाणे शुल्क आकारून व सेवा कर नियमानुसार शुल्क व्यतिरिक्त आकारून अटी / शर्तीच्या अधीन राहून संस्थेस भाडेतत्वावर देणेसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव तथा विचारार्थ सविनय सादर.

मा.सभापती : विषय क्र.128 मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे नागरी क्रिडा केंद्र क्र.5,एन-2, कम्युनिटी सेंटर सिडको येथील मागील गेटच्या बाजुची जागा गदा स्पोर्टस असोसिएशन,औरंगाबाद (कराटे

प्रशिक्षक) यांना कराटे प्रशिक्षण वर्गासाठी सायंकाळी 07 ते 09 या वेळेत प्रति खेळाडु प्रतीमाह 1 तास र.रू.100/- (अक्षरी शंभर रूपये फक्त) या प्रमाणे शुल्क आकारून व सेवा कर नियमानुसार शुल्क व्यतिरिक्त आकारून अटी/शर्तीच्या अधीन राहून संस्थेस भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 129 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-2 राबविण्यासाठी मा.सर्वसाधारण सभा दिनांक 11/01/2007 विषय क्रं.655/4 नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरील कार्यक्रम 2007 ते 2012 या कालावधी करिता होता. प्रकल्पाचा कालावधी संपल्यानंतर मनपातर्फे प्रकल्पाचा भार सोसण्यास व कार्यक्रम नियमित स्वरुपात राबविण्यास मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेनुसार मंजूरी देण्यात आलेली आहे. मा.अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांचे पत्र जा.क्रं.राकुकका/अर्बनआरसीएच/कक्ष-17/20172-44/07 दिनांक 26.3.2007 प्रकल्प राबविण्यासाठी मंजुरी देण्यात आलेली आहे.

वाढती लोकसंख्या, मातामृत्यू व बालमृत्यु एकूण प्रजनन दर कमी करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. याचप्रमाणे गरोदर माता, बालके, किशोरवयीन मुले व मुली यांच्याकरिता विविध आरोग्य सेवा सुविधा देण्यासाठी निरनिराळे आरोग्य विषयक कार्यक्रम राबविले जातात. मा.स्थायी समिती, महानगरपालिका औरंगाबाद दिनांक 10/03/2017 (दि.28/02/2017 रोजीची तहकुब सभा का.प.क्र.13) रोजीच्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त विषय क्रमांक 144 अन्वये प्राप्त मंजुरीनुसार आरसीएच-2 अंतर्गत कार्यरत एकूण 27 वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 03/02/2017 ते 31/07/2017 या कालावधीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदरील मुदतवाढ दिनांक 31/07/2017 रोजी संपुष्टात आलेली आहे. खालील सर्व पदे नियमित स्वरुपात न ठेवल्यास आरोग्य सेवा विस्कळीत होईल. यामुळे सर्व पदांची आवश्यकता आहे.

| अ.क्रं. | नांव | पदनाम | ठराविक वेतन |
|---|---|---|---|
| 01 | डॉ.वैशाली मुदगडकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.18000/- |
| 02 | डॉ.ऋता प्रकाश आनंदगांवकर | महिला वैद्यकीय अधिकारी | रु.18000/- |
| 03 | श्रीमती जया उघडे | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 04 | श्रीमती सुनिता गणपत नरवडे | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 05 | श्रीमती विद्या राजू शर्मा | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 06 | श्रीमती ज्योती रामचंद्र बनकर | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 07 | श्रीमती मेरी पाखरे | स्टाफ नर्स | रु.9000/- |
| 08 | श्रीमती ज्योती चव्हाण | एएनएम | रु.7500/- |
| 09 | श्रीमती द्रौपदी डक | एएनएम | रु.7500/- |
| 10 | श्रीमती लक्ष्मी पाटील | एएनएम | रु.7500/- |
| 11 | श्रीमती मिनाक्षी डोंगरे | एएनएम | रु.7500/- |
| 12 | श्रीमती रेखा नायमाने | एएनएम | रु.7500/- |
| 13 | श्रीमती शिला राठोड | एएनएम | रु.7500/- |
| 14 | श्रीमती सोनाली पावलस भिसे | एएनएम | रु.7500/- |
| 15 | श्रीमती वर्षा जाधव | एएनएम | रु.7500/- |
| 16 | श्रीमती वर्षा महादू सोनवणे | एएनएम | रु.7500/- |
| 17 | श्रीमती सुनंदा नामदेव चव्हाण | एएनएम | रु.7500/- |
| 18 | श्रीमती सारिका मनोहर इंगळे | एएनएम | रु.7500/- |
| 19 | श्रीमती कविता चव्हाण | एएनएम | रु.7500/- |
| 20 | श्रीमती वैशाली चिंतामण बिऱ्हारे | एएनएम | रु.7500/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 21 | श्रीमती सिमा अरुण गुरव | एएनएम | रु.7500/- |
| 22 | श्रीमती समिनाबेगम शेख सलीम | एएनएम | रु.7500/- |
| 23 | श्रीमती वर्षा हरिभाऊ फुले | एएनएम | रु.7500/- |
| 24 | श्रीमती आरती एकनाथ वाघमारे | एएनएम | रु.7500/- |
| 25 | श्रीमती अश्विनी रमेशराव परळकर | एएनएम | रु.7500/- |
| 26 | श्रीमती प्रियका चंद्रकांत मगरे | एएनएम | रु.7500/- |
| 27 | श्रीमती अग्नेस जे.मकासरे | एएनएम | रु.7500/- |

यामुळे सध्या कार्यरत 2 वैद्यकीय अधिकारी व 25 कर्मचारी यांना वेतनाकरिता मासिक रु.231000/- व वार्षिक खर्च रु.27,72,000/-अपेक्षित आहे. सदरील अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च मनपा अर्थसंकल्प माता व बाल संगोपन (आरसीएच) या घटकामध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. आरसीएच-2 अंतर्गत सध्या कार्यरत 2 अधिकारी व 25 कर्मचारी यांना प्रस्तावित केल्यानुसार 2 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन म्हणजे दिनांक 03/08/2017 ते 02/02/2018 या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे मान्यतेस्तव व मंजुरीस्तव सादर.

मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीत प्रजनन व बाल आरोग्य सेवा टप्पा-2 राबविण्यासाठी आरसीएच-2 अंतर्गत कार्यरत अ.क्र.01 ते 27 एकूण 27 वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना 2 दिवसांचा तांत्रिक खंड देऊन दिनांक 03/08/2017 ते 02/02/2018 या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यास व वेतनाकरिता येणाऱ्या मासिक र.रु.2,31,000/- व वार्षिक रु.27,72,000/- च्या अपेक्षित खर्चास मंजुरी देण्यांत येते तसेच वेतनावरील खर्च मनपा फंडातून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 130 : (अपील)**

जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, कंत्राटदार, महानगरपालिका औरंगाबाद यांना मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे पत्र क्र. मनपा/काअ/(1,2,3 व 8) /2016/525 दिनांक 10/02/2017 अन्वये महानगरपालिकेतील कंत्राटदारांच्या काळ्या (Black List) यादीत समाविष्ट करण्यांत आलेले आहे. या आदेशाविरूध्द संबंधीत कंत्राटदार जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, कंत्राटदार यांनी सदरील काळ्या यादीत (Black List) टाकण्याच्या आदेशाविरूध्द दिनांक 02/08/2017 रोजी स्थायी समितीकडे सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा.सभापती : जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीने काळ्या यादीमधुन (Black List) वगळण्याबाबत स्थायी समितीकडे अपील सादर केलेले आहे. या प्रकरणाची चौकशी केलेली आहे, चौकशीअंती सदर कंपनीने 300 पेक्षा जास्त रस्त्यांची कामे शहरात केलेली आहे. पूर्ण महाराष्ट्रात सदर कंपनीचे कामे चालू आहे. या कंपनीने केलेल्या मुख्य रस्त्यांचे कामांचे देयकही देणे बाकी आहे. छोट्या कारणामुळे काळ्या यादीत (Black List) टाकणे उचित दिसून येत नाही. त्यामुळे जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. ला काळ्या यादीतुन (Black List) वगळण्यात यावे. त्यांचे काळ्या यादीतील (Black List) नांव रद्द करण्यांत येते, याची दखल प्रशासनाने घ्यावी. चुकीचे काम कंपनीकडून झाले असेल तर कंपनीकडून सदरचे काम दुरूस्त करून घ्यावे व कंपनीनेही सदर काम दुरूस्त करून द्यावे, कंपनीने सादर केलेले अपील मंजुर करण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, कंत्राटदार, महानगरपालिका औरंगाबाद यांना मा.आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे पत्र क्र. मनपा/काअ/(1,2,3 व 8) /2016/525 दिनांक 10/02/2017 अन्वये महानगरपालिकेतील कंत्राटदारांच्या काळ्या (Black List) यादीत समाविष्ट करण्यांत आलेले आहे. त्यानुसार जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीने काळ्या यादीमधुन (Black List) वगळण्याबाबत स्थायी समितीकडे अपील सादर केलेले असल्यामुळे, या प्रकरणाची चौकशी केलेली आहे, चौकशीअंती सदर कंपनीने 300 पेक्षा जास्त रस्त्यांची कामे शहरात केलेली असल्याने व पूर्ण महाराष्ट्रात सदर कंपनीचे कामे चालू असल्याने, या कंपनीने केलेल्या मुख्य रस्त्यांचे कामांचे देयकही देणे बाकी असल्याने व छोट्या कारणामुळे काळ्या यादीत (Black List) टाकणे उचित दिसून येत नसल्याने, जी.एन.आय. इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या कंपनीला काळ्या यादीतुन (Black List) वगळण्यात यावे व त्यांचे काळ्या यादीतील (Black List) नांव रद्द करण्यांत येते, याची प्रशासनाने दखल घ्यावी. चुकीचे काम कंपनीकडून झाले असेल तर कंपनीकडून सदरचे काम दुरूस्त करून घ्यावे व कंपनीनेही सदर काम दुरूस्त करून द्यावे. कंपनीने सादर केलेले अपील मंजुर करण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 131 :**

विषय : वार्ड क्र.110 मयुरबन कॉलनी अंतर्गत त्रिशरण चौक ते चाणक्यपुरी पर्यंतच्या रस्त्याचा व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रूपये 2983733/- या रक्कमेस मान्यता घेणे बाबत तसेच सदर कामाचे ठेकेदार मे.कासलीवाल कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.77 टक्के जास्त दराने म्हणजे टेंडर रक्कम रूपये 29,47,751.39 पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : Closed offer Tender Date 11/08/2017

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | महानगरपालिका औरंगाबाद |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.110 मयुरबन कॉलनी अंतर्गत त्रिशरण चौक ते चाणक्यपुरी पर्यंतच्या रस्त्याचा व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 29,83,733/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 29,25,227.14 |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा ई - टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत (एकुण 04 वेळा) (2 वेळा फेर निविदा, 1 वेळा मुदतवाढ) | 11/08/2017 ते 23/08/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 01/09/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एक |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेद्दाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी / जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन | 2925227.14 | 0.77 टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |

| | | |
|---|---|---|
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय. |
| | तरी विषयाकिंत काम ठेकेदार मे.कासलीवाल कन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.77 टक्के जास्त दराने म्हणजेच टेंडर र.रू.29,47,751.39/- पर्यंत करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर. तथापी Star rate नुसार जास्त/कमी अदा/वसुली करणेच्या मान्यतेसह. | |

मा.सभापती : विषय क्र.131 मंजूर करण्यांत येतो.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.110 मयुरबन कॉलनी अंतर्गत त्रिशरण चौक ते चाणक्यपुरी पर्यंतच्या रस्त्याचा व्हाईट टॉपींगद्वारे विकास करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या Close Offer नुसार सदरील काम ठेकेदार मे.कासलीवाल कंन्स्ट्रक्शन यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.77 टक्के जास्त दराने म्हणजे टेंडर रक्कम रूपये 29,47,751.39 पर्यंत करून घेणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद